महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

क्र. मासंवि/सेप्र/न.क्र.४१/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : managerrc@mahadiscom.in.
Website : www.mahdiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३१ दिनांक २२.०२.२०१६

**विषय :** महावितरण कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या लेखा सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक,विद्युत सहाय्यक, उपकेंद्र सहाय्यक व वीज सेवक यांच्या मानधनातून म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीची वर्गणी कपात करणेबाबत.

..................

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपन्यांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांसाठी कर्मचारी कल्याण निधी समितीतर्फे निरनिराळया कल्याणकारी योजना राबविल्या जातात. कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांसाठी कल्याणकारी योजना राबविताना कर्मचारी कल्याण निधीमधून महावितरण कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या लेखा सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, विद्युत सहाय्यक, उपकेंद्र सहाय्यक व वीज सेवक यांच्या मानधनातून म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीची मासिक वर्गणी रु. १०/- कपात होत नसल्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना म.रा.वि.मं. क.कल्याण निधी समितीमधून कुठलीही आर्थिक मदत मिळत नव्हती.

२. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या दि. १३.१.२०१६ च्या ठरावानुसार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी प्रशासकीय परिपत्रक क्र. १ दि. २९.०९.२००५ नुसार त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करुन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमधील विहित पध्दतीने नियुक्त झालेल्या सर्व लेखा सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, विद्युत सहाय्यक, उपकेंद्र सहाय्यक व वीज सेवक यांच्या मानधनातून रु. १०/- (रु. दहा मात्र) ची कपात माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पगारापासून करण्यास व त्यांना कल्याण निधी समितीमधून देय आर्थिक मदत देण्यास मंजूरी दिली आहे.

३. सदर कपात केलेली रक्कम मुख्य लेखा अधिकारी (मंडळ लेखा), मुंबई यांचे परिपत्रक क्र. २३० दि. २७.०७.२००४ मध्ये नमूद केलेल्या ४४४३३२ या लेखासंहिता (Account Code) खाली जमा करावी.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

22/2/16.
(संदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

G:\data1\data0\ED_HR\Adm. Circular.doc